# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

# <u>सार्वजनिक आरोग्य खाते</u>

एचओ/ 830 /एमआरएएमएच दिनांक - 18.08.2023

## <u>जाहीर सुचना</u>

एम(पश्चिम) विभागातील मनपाकडे नोंदणीकृत असलेल्या स्वयंसेवी (NGO) संस्थाना या जाहीर सुचनेद्वारे असे कळविण्यात येते की,**मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रुसतीगृह, व्ही. एन. पुरव मार्ग, चेंबूर नाका, चेंबूर (पू.), मुंबई - 71** येथील प्रसुतीगृहासाठी `**ड**`संवर्गातील12 बहुउद्देशिय कंत्राटी कामगार यांची आवश्यकता आहे.

येथे असे सुचित करण्यात येते की, ज्या स्वंयसेवीसंस्था (NGO)कंत्राटी कामगार पूरवू इच्छितात त्यांनी प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहून रु. 3000 +18% GST रक्कम भरुन दि. 18.08.2023 ते दि. 24.08.2023 पर्यंत सकाळी 10.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत आपले अर्ज कार्यालयात सुटटीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

**(सोडत दिनांक - 30.08.2023)**

## परिशिष्ट - अ

## मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह चेंबुरनाका येथे बहुउद्देशिय कंत्राटी कामगार घेण्याकरीता कंत्राट रक्कम

## परिपत्रक क्र.प्रकाअ/११दि. २०.०३.२०२३ अन्वये ७३१.७३ रुपये प्रतिदिन प्रति कामगार

| अनु.क्र. | विभाग | कालावधी | आवश्यक कामगार | एकुण कंत्राट रक्कम (प्रतिदिन प्रति कामगार दर रु. ७३१.७३X१२ कामगार संख्या X १५६ मनूष्य दिवस ) (रु.) | एकूण कंत्राट किमतीच्या लेव्ही ४९.५८% | एकुण कंत्राट रक्कम % लेव्हीसहीत (रु.) (५+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह, चेंबूरनाका | सहा महिने (एकुण १५६ दिवस | १२ | १३६९७९८.५६ | ६७९१४६ | २०४८९४५ |

## परिशिष्ट - ब

## कामाचे साहितय

| परिक्षेत्र | मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतिगृह चेंबूरनाका |
|---|---|
| अर्जदार संस्थेने मनुष्यबळासोबत पुरवायची साधणे | ❖ कामगारांसाठी गणवेश<br>❖ ओळखपत्र<br>❖ सुरक्षित साधणे |

सही /-

वैदयकीय अधिकारी

मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतिगृह

**<u>सुचनेच्या अर्जाचा नमुना</u>**

## <u>परिशिष्ट क</u>

(अर्जदार संस्थेने आपल्या मुखपत्रावर (Letter Head) मुळ प्रतीत सादर करावा.)

प्रति,
वैदयकीय अधिकारी
मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह
चेंबुरनाका ,
चेंबुर, मुंबई - ४०००७१

विषय - एम पश्चिम विभागातील मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहामध्ये (कंत्राटी कामगार) पुरविणेसाठी दिलेल्या जाहीर नोटीसबाबतचा अर्ज

महोदय,

आमची संस्था एम पश्चिम विभागामध्ये दिलेल्या जाहीर नोटीसी, द्वारे मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहामध्ये कंत्राटी कामगार पुरवू इच्छिते. तरी आम्हाला कृपया संधी मिळावी. संस्थेने आतापर्यंत केलेल्या कामाची माहिती पुढीलप्रमाणे -

1) प्रशासकीय माहिती -

1) संस्थेचे नांव - ________________________________

2) नोंदणी क्रमांक - ________________________________

3) कार्यालयीन पत्ता - ________________________________

4) पत्रव्यवहाराचा पत्ता - ________________________________

5) संस्थेचे बँक खाते असलेल्या बँकेचे नांव - ____________ खाते क्र. ________

6) संस्थेचे पॅन कार्ड नं. ________________________________

7) वेन्डर रजि. नं. ________________________________

8) संस्थेचे संपर्क दुरध्वनी क्र. निवास ______________ कार्यालय ________

9) संस्था पदाधिकारी माहिती

| संस्था पदाधिकारी | संपुर्ण नांव | संस्थेच्या शिक्कयासहीत छायाचित्रे | निवासी पत्ता | दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सचिव | | | | | |
| खजिनदार | | | | | |

(वास्तवाचा पुरावा/कागदपत्रे जसे की, रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, सरकारी निमसरकारी यंत्रणेने दिलेली ओळखपत्रे)

ब) लेखा परिक्षण अह वाल - संस्थेचे अलिकडील दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल

क) कंत्राटी कामगारांचा पुरवठा केल्याबाबत कामाचा पुर्वीचा अनुभव -

____________________________________________________________

____________________________________________________________

ड) अन्य माहिती - संस्था सध्या मनपाच्या इतर उपक्रमात सहभागी आहे काय ? त्याचा तपशील कार्यादेश कामाचे स्थळ कामाचा अवधी व त्यासंबधीची माहिती (खोटी माहिती दिल्यास किंवा माहिती लपविल्यास संस्था कारवाईस पात्र राहील.)

| उपक्रमाचा तपशील | कार्यादेश | कामाचे स्थळ | कामाचा अवधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

इ) महापालिकेच्या कोणत्याही कामामध्ये झालेल्या दंडात्मक कारवाईची माहिती - (संस्थेचे पदाधिकारी व सस्था यावर पुर्वी कारवाई झाली असल्यास त्याचा तपशील इ. )

____________________________________________________________

____________________________________________________________

(असल्यास सर्व साक्षांकीत कागदपत्रे
सोबत सादर करावीत)

फ) संस्था किंवा संस्थेच्या पदाधिका-यांवर काही फौजदारी कार्यवाही झालेली असल्यास अथवा सुरु असल्यास त्याची माहिती पुढीलप्रमाणे -

____________________________________________________________

____________________________________________________________

आम्ही संस्थेचे पदाधिकारी म्हणून वर नमूद केलेली माहिती सत्य असून त्यामध्ये कोणतीही तफावत आढळल्यास किंवा चुकीची माहिती दिल्यास आमची संस्था महापालिकेच्या कायदेशीर कारवाईस पात्र असेल, तसेच मनुष्यबळअंतर्गत म.न.पा. च्या नियम व अटी प्रमाणे तसेच विहित केलेल्या राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या किमान वेतन दराप्रमाणे काम करण्यास आम्ही बांधिल असुन, त्यामध्ये आमची संस्था भविष्यात कोणतीही तक्रार किंवा सबबी सांगुन प्रसुतीगृहामध्ये कामगार पुरविण्याबाबत दुर्लक्ष अथवा निष्काळजीपणा करणार नाही. याची आम्ही संस्थेमार्फत हमी देत आहोत.

कृपया सादर.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

## परिशिष्ट ‘ड’

## हमीपत्र

(५००/- रुपये सटॅम्प पेपरवर सादर करावे.)

मी, श्री/श्रीमती ................................................................................ या संस्थेचा पदाधिकारी म्हणून .......................... या पदावर दि....................... पासून कार्यरत असून संस्थेच्या नियमाप्रमाणे माझी सदर पदावर नियमानुसार/ठरावानुसार मला संस्थेच्या वतीने सदर हमीपत्र देण्याचा अधिकार असून त्यानूसार मी खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहे.

मुंबई महानगपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याच्या विभागाअंतर्गत येणा-या. मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह चेंबुरनाका ,

- ❖ प्रसुतीगृह.............विभाग येथे प्रसुतीगृहामध्ये बहुउद्देशिय कंत्राटी कामगार सहा महिन्यांच्या कालावधीसाठी विभागात आवश्यक कामगार उपलब्ध करुन देण्यासाठी आमच्या संस्थेला मिळण्यासाठी संकेतस्थळावर व एम पश्चिम विभाग येथे दिलेल्या जाहिर सुचने अंतर्गत अर्ज केला असून अर्जात नमूद सर्व तपशील माझे माहितीनुसार योग्य व खरे आहेत.
- ❖ मी शपथपूर्व जाहीर करतो की आमच्या संस्थेचा उद्देश हा संस्थेच्या सभासदांना रोजगार मिळवून देणे हा असून माझ्या संस्थेस कार्यादेश मिळाल्यास आम्ही नियमानूसार काम करण्याची हमी याद्वारे देतो.
- ❖ आम्हाला मिळालेला कार्यादेश संपूर्ण अथवा विभागून अन्य संस्था किंवा कंत्राटदारास देणार नाही.
- ❖ अर्जात नमूद केलेल्या सर्व बाबी मी वाचल्या आहेत व मला समजल्या आहेत. परिशिष्टातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. मी असे जाहीर करतो / करते की अर्जात दिलेली माहिती माझ्या विशवासानुसार सत्य व योग्य असून ती असत्य असल्याचे दिसून आल्यास मी कायदेशीर कारवाईला पात्र असेन, तसेच संस्थेला मिळालेले काम / कार्यादेश त्याच्यामुळे
  रद्द होऊ शकतो हे मला मान्य आहे.

स्वाक्षरी ....................................
..

नांव .........................................
..

पदनाम .....................................
..

पत्ता .........................................

दिनांक .....................................

# बृहन्मुंबई महानगरपालिका

मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह चेंबुरनाका

एचओ/ / एम.आर.ए.एम.एच. दिनांक - ०

**परिशिष्ठ - इ**

विषय - मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहामध्ये कंत्राटी कामगार सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नेमण्याकरिता एम पश्चिम विभागामध्ये नोंदणीकृत असलेल्या स्थानिक सेवाभावि संस्थेमधुन एका संस्थेची निवड करण्याकरिता मनपा संकेतस्थळावर जाहिरात व एम पश्चिम विभाग येथे जाहीर सूचनेद्वारे अर्ज मागवून निवड करण्याबाबत..

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक आरोग्य खात्याच्या मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहामध्ये सहा महिन्याकरिता कंत्राटी कामगारांचा पुरवठा करण्यासाठी एम पश्चिम विभागात अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या स्थानीक संस्थेमधून एका संस्थेची निवड करण्याकरिता एम पश्चिम विभाग येथे जाहीर नोटीस व मनपा संकेतस्थळावर दिलेल्या सूचने अंतर्गत प्राप्त झालेल्या पात्र अर्जांमधून प्रसुतीगृहासाठी सोडत काढून एका संस्थेची नेमणूक करण्यात येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| | मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहामध्ये कंत्राटी कामाचा तपशील खालीलप्रमाणे | |
| १ | कामाचा तपशील | मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहासाठी एकूण ११ कंत्राटी कामगार सहा महिन्याच्या कालावधीसाठी ०८ स्त्री सफाई कामगार, ०२ आया, ०१ हमाल ही पदे उपलब्ध करुन देणे. |
| २ | परिमाण | सोबत **परिशिष्ठ अ** जोडल्याप्रमाणे |
| ३ | कराराचा कालावधी | मंजुरी सापेक्ष सहा महिन्याकरिता मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहामध्ये असणार आहे. |
| ४ | दर/ किंमत | 1) शासन धोरणानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील किमान वेतन दर (प्रतिदिन प्रती कामगार) अधिक ४९.५८%लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र.प्रकाअ/११ दि. २०.०३.२०२३ मधील अटींच्या पूर्ततेनंतर करणे.<br>2) सदयःस्थितीत प्रमुख कामगार अधिकारी याचे परिपत्रक क्र.प्रकाअ/११/२०२२-२३ दि. २०.०३.२०२३ अन्वये किमान वेतनदर रु. ७३१.७३ प्रतिदिन प्रतिकामगार असा आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५ | अटी व शर्ती | **1) अर्ज सादरीकरण -**<br>1. अर्जदार संस्थेने परिशिष्ठ फ मध्ये नमूद केलेल्या अर्जाची रक्कम मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह यांच्या कार्यालयाव्दारे चलन प्राप्त करुन नागरी सुविधा केंद्रावर भरणा केल्यानंतर संस्थेच्या मुखपत्रावर (Letter Head) परिशिष्ठ क प्रमाणे मूळ प्रतीत मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह यांच्या सूचनापत्रामधील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर अर्ज सादर करावा. सदर भरणा केलेल्य पावतीची छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल.<br>2. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था ही द महाराष्ट्र को-ऑप. सोसायटी ॲक्ट १९६० या कायदयाने स्थापन झालेली नोंदणीकृत संस्था असल्याबाबतची उपनिबंधक/सहायक निबंधक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल.<br>3. अर्जदार सहकारी संस्था/बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागात नेमून दिलेल्या कामाकरिता अनुभव असलेल्या विविध खाते प्रमुखांच्या विविध कालाधींच्या साक्षांकित छायांकित प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक असेल. त्यासोबत अनुभव दर्शविणा-या कार्यदेशांच्या साक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक असेल.<br>4. अर्जदार सहकारी संस्था/ बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे भविष्य निर्वाह निधि आणि संकीर्ण तरतुदी अधिनियम १९५२ कायद्याअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल. तसेचपुरविण्यात येणा-या कामगारांच्या बाबतीत या अधिनियमाखाली आवश्यक तो निधी संबधित शासकीय कार्यालयात वेळोवेळी जमा करणेबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील व त्याच्या प्रतिपूर्तीसापेक्ष त्याचे अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.<br>5. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे राज्य कामगार विमा योजना {ई.एस.आय.सी}ॲक्ट १९४८ कायद्याअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल.तसेच पुरविण्यात येणा-या कामगारांच्या बाबतीत या अधिनियमाखाली आवश्यक तो निधी संबधीत शासकीय कार्यालयतात प्रत्येक महिन्यात जमा करणेबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील व त्याच्या प्रतिपूर्तीसापेक्ष त्याचे अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.<br>6. अर्जदार सहकारी संस्था/बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांची सन २०२०- |

२०२१ व सन २०२१-२०२२ या दोन वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल ही **परिशिष्ट 'फ'**प्रमाणे देण्यात आलेल्या एकूण कंत्राट रकमेच्या ( किमान वेतन दर अधिक ४९.५८% लेव्ही ) ३०%रकमेईतकी असणे आवश्यक आहे. सन २०१९-२०, २०२०-२१ या दोन आर्थिक वर्षाचे ताळेबंद अहवाल व वार्षिक उलाढालीच्या सनदी लेखापालांच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल.

7. अर्जदार सहकारी संस्था /बेरोजगार सेवा सहकारी संस्था **परिशिष्ट 'फ'**प्रमाणे देण्यात आलेल्या एकूण कंत्राट रकमेनुसार अधिकृत बँकेच्या आवश्यक पतपत्राची मुळ प्रत जोडणे आवश्यक असेल. अर्ज दाखल केलेल्या दिनांकापासून अगोदरच्या सहा महिन्यांच्या कालावधीतील पतपत्र (letter of Solvency)वैध्य धरण्यात येईल.
8. अर्जदाराने शासनाच्या अधिकृत प्राधिकरणाने योग्य त्या नमुन्यात दिलेल्या वस्तू व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्राची (GST Registration)साक्षांकित छायांकित प्रत देणे आवश्यक आहे. संस्थेच्या एकूण उलाढालीनुसार संस्थेस वस्तू व सेवाकर नोंदणी करणे आवश्यक नसल्यास तसे प्रमाणपत्र संस्थेच्या मुखपृष्ठावर संस्थाचालकाने देणे बंधनकारक असेल.
9. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे अर्ज सादर करताना संस्थेच्या नावाचे पॅन कार्ड सोबत जोडणे आवश्यक असेल.
10. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेचे आर्थिक व्यवहार असलेले बँकेचे नांव व खाते क्र. असलेल्या बँकेच्या खातेपुस्तिकेचि साक्षांकित छायांकित प्रत देणे सोबत जोडणे आवश्यक असेल.
11. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे अर्ज सादर करताना परिशिष्ट 'ड' प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु. ५००/- किंमतीच्या मुद्रांकीत कागदपत्रावर (Stamp paper) हमी पत्र देणे आवश्यक असेल.
12. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेची उपविधि / घटना याची साक्षांकित छायांकित प्रत देणे आवश्यक आहे.

**ब) अर्ज पडताळणी :**

1. अर्जदार संस्थांनी सुचनापत्र मनपा संकेतस्थळावर व एम पश्चिम विभागामध्ये प्रकाशित केल्यापासून १०(दहा) दिवसांच्या आत लेखी पत्राद्वारे सुचना कराव्यात. अर्जदार संस्थांनी केलेल्या केवळ लेखी सूचनांची दखल घेण्यात येईल.
2. ज्या अर्जदार सहकारी संस्थां / बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना मुंबई महानरपालिकेने यापुर्वी काळ्या यादीत टाकलेले असेल किंवा ज्या संस्थेचे

काम समाधानकारक नाही म्हणून त्यांना काढून टाकले असेल अशा संस्थांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

3. एखाद्या संस्थेस आपल्या प्रतिस्पर्धी संस्थेबाबत त्याने कागदपत्रे / माहिती / किंवा सादर केलेल्या इतर कागदपत्रांबाबत तक्रार असल्यास त्यांच्या पडताळणीकरीता  रू.२५०००/- (रू. पंचवीस हजार फक्त) इतकी रक्कम महानगरपालिकेच्या तिजोरीत अगोदर भरणा करणे आवश्यक आहे. जर सदर संस्थेने केलेली तक्रार असत्य व योग्य आढळल्यास सदर तक्रारदार संस्थेची रु.२५०००/- परतावा रक्कम जप्त केली जाईल तसेच जर तक्रार सत्य व योग्य असेल तर ज्या संस्थेबाबत तक्रार असेल  त्या संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व रु.२५०००/- दंड व ५ वर्षांकरिता काळ्या यादीत टाकले जाईल.
4. अर्जदार संस्थांनी सादर केलेली कागदपत्रे, पडताळणी अधिकारी / कर्मचारी आवश्यकता वाटल्यास त्याची शहानिशा करु शकतील. सदर कागपत्रे चुकीची किंवा खोटी आढळल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व रु.१००००/- इतका दंड व ५ वर्षांकरिता काळ्या यादीत टाकले जाईल.
5. पडताळणी दरम्यान न जोडलेल्या आवश्यक कागदपत्रांची दूरध्वनीव्दारे दोन दिवसात पुर्तता करण्यास अर्जदार संस्थेस कळविले जाईल. पुर्तता न केल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत विहित मुदतीनंतर संस्थांची कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. अर्जदार संस्थेने सादर केलेली कागदपत्रे परत करण्यात येणार नाहीत.
6. पडताळणी दरम्यान संस्थाचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी पडताळणी कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याशी कसल्याही प्रकारे संपर्क साधू नये. तसेच कसल्याही प्रकारचे दबाब तंत्र वापरल्यास सदक संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
7. अर्जदार संस्थांच्या केवळ लेखी सूचनांची दखल घेण्यात येईल.
8. पडताळणी प्रक्रिया कालावधी, अर्ज जमा करणेचा कालावधी व सोडतीचा दिनांक, वेळ व ठिकाण सर्व सूचनापत्रामध्ये नमूद करण्यात येईल. पात्र व अपात्र संस्थांची यादी वैदयकीय अधिकारी, मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह चेंबुरनाका यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

) **संस्था निवडीकरीता अर्जांची सोडत:**

1. सोडती दरम्यान, संस्थाचालक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधि यांनाच प्रवेश दिला जाईल. अधिकृत प्रतिनिधिकरिता संस्थाचालकांचे अधिकार पत्र

| | | |
|---|---|---|
| | | सादर करणे आवश्यक आहे.<br>2. अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्व अटी व शर्ती पूर्ण करणा-या पात्र अर्जदार संस्थांमधून सोडत काढण्यात येईल.<br>3. जर अर्ज प्राप्त झाले नसतील तर पुनश्चः सात दिवसांचा कालावधी देऊन सूचनापत्रद्वारे अर्ज मागविण्यात येतील. तरीदेखील प्रतिसाद न मिळाल्यास वैदयकीय अधिकारी, मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह एम पश्चिम विभाग व उपायुक्त परिमंडळ - ५ यांच्या मंजुरी अन्वये त्या विभागातील परिरक्षण अथवा घनकचरा व्यवस्थापन खात्यातील कार्यरत स्वयंसेवक पुरविणा-या संस्थांकडून संमती पत्र घेऊन नेमणूक करतील.<br>**ड) निवड पश्चात :**<br>1. सोडतीमध्ये प्रथम क्रमांकावरील असलेल्या संस्थेची नेमणूक करण्यात येईल.<br>2. निवड झालेल्या संस्थेने काम करण्याचे नाकारल्यास सोडतीमधील प्रतिक्षा यादीवरील द्वीतीय क्रमांकाच्या संस्थेस संमती पत्र घेऊन नेमणूक करण्यात येईल.<br>3. व्दितीय क्रमांकाच्या संस्थेनेसुध्दा काम करण्याचे नाकारल्यास सोडतीमधील प्रतिक्षा यादीवरील तृतीय क्रमांकाच्या संस्थेस संमतीपत्र घेवुन नेमणूक करण्यात येईल.<br>4. एका संस्थेला नेमून दिलेले ठराविक काम ती संस्था दुस-या संस्थेला पुनर्वाटप करुन देऊ शकणार नाही. तसे केल्यास अशा संस्थेला महापालिकेतर्फे दिलेले कंत्राट त्वरित रद्द करण्यात येईल. व त्या सैंस्थेस काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच प्रतिक्षा यादीवरील द्वितीय क्रमांकावर असलेल्या संस्थेची नेमणूक करण्यात येईल.<br>5. निवड झालेल्या संस्थेस आवश्यक ते विधि शुल्क, साधन साहित्य आकार आणि दस्तऐवजावर स्टॅम्प ड्युटी रक्कम बँक हमीपत्राच्या स्वरुपात भरल्यास त्यावर स्टॅम्प ड्युटी रक्कम व प्रसंगानुरुप जे-जे अनुज्ञेय असेल ते त्या-त्या वेळी अदा करणे बंधनकारक असेल.<br>6. नियुक्त केलेल्या संस्थेने नियुक्ती दिनांकापासून ३० दिवसात ५०,०००/- रुपये सुरक्षा अनामतरक्कम म्हणून महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणे आवश्यक आहे.<br>7. निवड झालेल्या सहकारी संस्थेने / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने कार्यादेश प्राप्त झाल्यावर आवश्यक कामगारपुरविताना ते कामगार त्या संस्थेचे सभासद असल्याबाबतचे प्रमाणपत्र सेस्थेच्या मुखपत्रावर (letter head) देणे बंधनकारक राहील. सदर सभासदांची संपुर्ण नावे, कायमचा पत्ता, छायाचित्र व बँक पासबुकची छायांकित प्रत वैदयकीय अधिकारी, |

मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह यांना सादर करणे आवश्यक असेल.

8. नियुक्त अर्जदार सहकारी संस्थेने /बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने महापालिकेबरोबर महापालिका अधिनियम १८८८ कलम ७० (१)(ब) नुसार लिखित करार करणे बंधनकारक असेल. कराराबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय हा मान. महानगरपालिका आयुक्तांचा असेल.

९. संस्थेची निवड झाल्यानंतर कंत्राट करार होण्यापूर्वी जर असे निदर्शनास आले की, संस्थेनी अर्जासोबत दिलेली माहिती व कागदपत्रे ही खोटी किंवा चुकीची आहेत, तर सदर संस्थेस ५ वर्षांकरिता काळ्या यादीत टाकले जाईल व ते काम सोडतीमधील पुढील दुस-या या क्रमांकाच्या संस्थेस देण्यात येईल. कंत्राट करार निष्पादित झाला असल्या देखील सदर कंत्राट रद्द करण्यात येईल व वरील प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**ई) सर्वसाधारण:**

1. निवड झालेल्या सहकारी संस्थेकडून वैदयकीय अधिकारी, मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहासाठी नेमण्यात आलेल्या प्रत्येक कामगारास प्रमुख कामगार अधिकारी यांचेकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या परिपत्रक प्रकाअ/११/२०२२-२०२३ नुसार अनुज्ञेय किमान वेतन अधिका ४९.५८% लेव्हीचे अधिदान परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेसापेक्ष करावयाचे आहे.
2. ४९.५८% लेव्हीमध्ये भविष्य निर्वाह निधि १३%, कामगार विमा ३.२५%सानुग्रह अनुदान ८.३३%, रजेचे रोखीकरण ६%व सणांच्या आणि सार्वजनिक सुटया चे रोखीकरण १%, उपदान ४%, सेवा शुल्क/प्रशासकीय खर्च ५%घरभाडे भत्ता ५%तसेच सुरक्षितता साधने ४%या बाबींचा समावेश आहे.
3. निवड झालेल्या सहकारी संस्थेने / बेरोजगार सेवा सहकारी संस्थाचालकाने परिपूर्ण मासिक देयेके प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत वैदयकीय अधिकारी मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहाच्या कार्यालयात सादर करावीत. तसेच सदर संस्थाचालकाने महानगरपालिकेस सादर केलेल्या देयकांचे अधिदान मुंबई महानगरपालिकेकडून होण्यावर अवलंबुन न राहता, प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत कर्षित धनादेश / ECS / RTGS / NEFTद्वारे कामगारांना पुर्ण अधिदान अदा करणे बंधनकारक आहे.
4. संस्थेच्या कामगारास देण्यात आलेल्या अधिदानाचा संबंधित बँक खात्यातील तक्ता, बँक पास बुकातील वेतनाच्या नोंदी किंवा प्रती महीन्याच्या २२ तारखेपर्यंत नियुक्त संस्थेने वैदयकीय अधिका-यांना सादर

करणे बंधनकारक राहील. तसेच त्याची योग्य ती शहानिशा वैदयकीय अधिकारी यांनी पुढील महिन्याच्या देयकाच्या अधिदानापूर्वी करावी. कामगारास केलेल्या अधिदानामध्ये त्रुटी आढळल्यास त्या संबंधी वैदयकीय अधिकारी त्रुटी सुधारण्याकरीता संस्थाचालकाशी त्वरीत पत्रव्यवहार करतील.

5. नियुक्त करण्यात आलेली सहकारी संस्था बेरोजगार सेवा सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था, कामगारांची उपस्थिती दररोज ठेवतील आणि महिना पुर्ण होताच प्रभाव्य अहवालासोबत वैदयकीय अधिकारी मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह पडताळून अधिदानाकरिता लेखा अधिकारी एम/ पश्चिम यांना सादर करतील.
6. निवड झालेल्या सहकारी संस्थेला / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेला त्यांच्या सदस्यास म्हणजेच कामगारास, कायद्याप्रमाणे आजारपण / अपघात इत्यादीसाठी विमा संरक्षण नियमानुसार प्राप्त करुन देणे बंधनकारक असेल व ही संबंधित संस्थेची सर्वस्वी जबाबदारी असेल.
7. संबंधित सर्व कामगार काद्याचे पालन करणे नियुक्त केलेल्या अर्जदार सहकारी संस्था / बरोजगार सेवा सहकारी संस्थांना बंधनकारक राहील.
8. नियुक्त सहकारी संस्थेच्या / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या सदस्यास ओळखपत्र देण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहील याबाबत आवश्यक ती खातरजमा वैदयकीय अधिकारीकरतील.
9. नियुक्त सहकारी संस्थेच्या / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या सदस्याची वयोमर्यादा १८ वर्षा खालील नसावी.
10. प्रत्येक महिन्याच्या अखेरीस एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल. तसेच एका कॅलेंडर महिन्यातील रविवार व सार्वजनिक सुट्टी हे सुट्टीचे दिवस वगळून कामाचे दिवस २६ दिवसांपेक्षा अधिक होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल. सुचनापत्रातील नमुद कालावधि दरम्यान कामगारास पुरविलेल्या दिवसांकरिताच अधिदान करण्यात येईल. कार्यादेशात अथवा परिशिष्ट ‘अ’ मध्ये नमुद केलेल्या एकूण दिवसांच्या कालावधीपेक्षा कमी दिवस भरल्यास संस्थांना उर्वरित दिवसांची भरपाई देण्यात येणार नाही किंवा कामाच्या कालावधी सुद्धा वाढवून देण्यात येणार नाही.
11. प्रसुतीगृहातील कामगारांना साधने व सुरक्षा साधने पुरविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
12. गणवेश परिधान केलेला, नियुक्त सहकारी संस्थेचा / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेचा कामगार सकाळी ७.०० ते २.०० या कालावधीमध्ये ओळखपत्रासहीत,उपकरणे व साधनांसह उपकरणे व साधनांसह उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याच्या जागी इतर कोणाचीही उपस्थिती ग्राह्य

| | | |
|---|---|---|
| | | धरली जाणार नाही.<br>13. कामगारांना प्रसुतीगृहामध्ये तिन्ही पाळीमध्ये काम करणे बंधनकारक आहे वैदयकीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार, जादा कामाकरीता महानगरपालिकेतर्फे कोणतेही अतिरिक्त अनुदान / अधिदान मंजूर करण्यात येणार नाही.<br>14. नियमित काम करणा-या महानगरपालिकेच्या कर्मचा-याप्रमाणे महापालिकेचे फायदे संस्थेच्या कामगारास मिळणार नाहीत तसेच महापालिकेत कोणत्याही परिस्थितीत सामावून घेतले जाणार नाही.<br>15. कोणतीही सुचना न देता संस्थेचे काम थांबविण्याचे अधिकार प्रशासनास असतील.<br>16. नियुक्त संस्थेस काम बंद करावयाचे असेल तर त्यासंबंधित लेखी सूचना वैदयकीय अधिकारी यांना एक महिना अगोदर द्यावी लागेल. एखाद्या संस्थेने नियमानुसार काम सोडले तर त्या ठिकाणी प्रतिक्षा यादीवरील पुढील संस्थेची नेमणूक उपकार्यकारी आरोग्य अधिकारी व कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या मंजूरीनुसार करण्यात येईल.<br>17. नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेवर, बृहन्मंबई महानगरपालिकेने नेमून दिलेले काम प्रशासनास समाधानकारक होईल अशा प्रकारे पार पाडणे बंधनकारक राहील.<br>18. नियुक्त केलेल्या संस्थांच्या कामगारांचे समाधानकारक काम न केल्यास अथवा नियुक्त केलेल्या संस्थेने कराराप्रमाणे दायित्व पार न पाडल्यास सदर सहकारी सेवा संस्थेसोबत केलेला करार कोणतेही कारण न देता खंडीत / रद्द करण्यात येईल आणि या सहकारी सेवा संस्थेची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल व त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार द्वीतीय किंवा तृतीय संस्था नियुक्त केली जाईल आणि त्याची संपुर्ण जोखीम आणि खर्च कसूरदार संस्थेकडून मनपा प्रणालीनुसार वसूल केला जाईल.<br>19. नियुक्त संस्था पार पाडत असलेल्या कामाच्या संदर्भात संस्थेकडून अथवा संस्थेने नेमलेल्या कामगाराकडून जर काही गैरवर्तणूक, नुकसान, महापालिकेच्या तसेच आम जनतेच्या मालमत्तेचे अपहरण अथवा हानी झाल्यास त्यास महापालिका प्रशासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. त्याची संपुर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील. त्याच प्रमाणे दोषी कामगारासत्वरित टाकण्याची व पुढील कारवाई करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची असेल.<br>20. करार कालावधित नियुक्त संस्थांतर्फे दायित्व निभावना-या कामगाराकडून नेमून दिलेले काम पार पाडत असताना महापालिकेचा तोटा, हानी अथवा |

नुकसान होणार नाही याची हमी कराराचे दायित्व निभावना-या नियुक्त संस्थेवर राहील. तथापी महापालिकेस काही हानी, तोटा अथवा नुकसान झाल्यास महापालिकेतर्फे वैदयकीय अधिकारी, मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह यांनी परिगणन केलेला नुकसानिचा खर्च हा संबंधित नियुक्त संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

21. कामगारांना पुरविण्यात आलेल्या संबंधित साधनांचा अपहार, गैरवापर किंवा अपव्यय कामगाराने केल्याचे आढळल्यास त्याचे सभासदत्व रद्द करुन त्याला कामावरुन काढून टाकण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची असेल व अशा कामगारास भविष्यात कोणत्याही विभागात कोणतेही काम सदर संस्थेमार्फत देण्यात येणार नाही ही खबरदारी संस्था घेईल.
22. नियुक्त संस्थेच्या सभासदांना प्रचलीत किमान वेतन दराने मासिक अधिदान व ४९.५८%लेव्ही याबाबतची जी देणी आहेत ती त्यांनी कामगार कायद्यानुसार विहीत वेळेत पुर्णपणे अदा करणे गरजेचे आहे. त्याकरिता संबंधित संस्था पुर्णपणे जबाबदार राहतील. सदर अपूर्ण अथवा कमी अदा केल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्त संस्थेस कोणतीही पुर्वसुचना न देता काळ्या यादीत टाकणयात येईल.
23. नियुक्त संस्थेचे चालक / पदाधिकारी हे महानगरपालिकेच्या कोणत्याही खात्यामध्ये कायम किंवा हंगामी पदाचे कर्तव्य पार पाडत असल्याचे आढल्यास सदर संस्थेला देऊ केलेले काम रद्द करण्यात येईल. सदर संस्थेच्या जागी द्वितीय क्रमांकाच्या संस्थेस काम देण्यात येईल. महानगरपालिका नियमाअंतर्गत सदर संस्थेचे चालक / पदाधिकारी यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
24. प्रसुतीगृहामध्ये पुरविण्यात आलेलीही सेवा २४३wअन्वये 'निव्वळ सेवा' (Pure services) असल्याने त्यांना वस्तू व सेवाकर लागू नाही. तथापि शासनाकडून वेळोवळी प्राप्त झालेल्या वस्तू व सेवाकरांसंदर्भातील निदेशानुसार अटी व शर्तीची पुर्तता करणे नियुक्त करणे नियुक्त केलेल्या सहकारी संस्थेला / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेला बंधनकारक राहील.
25. नियुक्त संस्थेने सदर कामांबाबतच्या सुचनेतील नमुद अटी व शर्ती मान्य असल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे क्रमप्राप्त असेल.

फ) दंडात्मक कारवाई :

1. संस्थेचा सभासद / कामगार सकाळी ७.०० वाजता कामगार वेळेवर हजर झाल्यास त्यास काम देण्यात येईल अन्यता सहकारी संस्थेने त्याच्या जागेवर बदली कामगाराकडून अन्य कामगार उपलब्ध करुन देणे आवश्यक

राहील, अन्यथा सहकारी संस्थेस प्रतिदिनी प्रति कामगारास रु. १५०/- इतका दंड आकारण्यात येईल.

2. नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारे मोर्चा, आंदोलन, संप, दंगलीमध्ये तसेच राजकीय, इत्यादी कारणासाठी सहभागी होता येणार नाही. सदर संस्थेचे कामगार अशाप्रकारे सहभागी झाल्याचे आढळल्यास त्यांच्या एक दिवसाच अधिदानाच्या सात पट रक्कम दंड म्हणून वसुल केलेले जाईल. त्याचप्रमाणे संबंधित संस्थेस काळ्या यादीत टाकण्यात येईल व त्यांना देऊ केलेले काम रद्द करण्यात येईल. तसेच सदर संस्थेचे चालक / पदाधिकारी यांच्या नावे अथवा त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावे कोणतीही संस्था असल्यास अथवा नविन संस्था सुरु केल्यास अशा संस्थेला महानगरपालिकेतर्फे काम / कंत्राट देण्यात येणार नाही व दिले असल्यास त्वरित रद्द करण्यात येईल. सदर संस्थेच्या जागी द्वितिय क्रमांकाच्या संस्थेस काम देण्यात येईल.
3. नेमणुक झालेल्या संस्थेने सर्व कामगारांना परिशिष्ठ ‘ब’ अन्वये सुरक्षित साधणे व गणवेश पुरविणे बंधनकारक असेल व न पुरविल्यास दंड आकारण्यात येईल.
4. स्वयंसेवक अधिदान नियुक्त सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत अदा केले नाही तर रु.१०००/- ईतका दंड संस्थेकडून आकारण्यात येईल व असे तीन वेळा घडल्यास सदर संस्थेस ३ वर्षाकरिता काळ्या यादीत टाकणे व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे इत्यादी शिक्षा देण्याची शिफारस संबंधित वरिष्ठांकडे करण्यात येईल व त्यानुसार पुढील कार्यालयीन कारवाई करण्यात येईल.
5. नेमणुत झालेल्या संस्थांनी सर्व स्वयंसेवकांना मासिक अधिदान प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत कर्षित धनादेश / ECS / RTGS /NEFT द्वारे न केल्यास सदर संस्थेला रु. २०००/- दंड आकारण्यात येईल.
6. नेमणुक झालेल्या संस्थांनी सर्व कामगारांना ओळखपत्र न दिल्यास प्रत्येक स्वयंसेवकामागे रु.५०/- इतका दंड आकारण्यात येईल.

## परिशिष्ट - ‘फ’

विषय - मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहामध्ये कंत्राटी कामगार सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नेमण्याकरिता एम पश्चिम विभागामध्ये नोंदणीकृत असलेल्या स्थानीक सेवाभावि संस्थेमधुन एका संस्थेची निवड करण्याकरिता मनपा संकेतस्थळावर जाहिरात व एम पश्चिम विभाग येथे जाहीर सूचनेद्वारे अर्ज मागवून निवड करण्याबाबत..

संदर्भ : परिपत्रक क्र. सीए / एफआरजी /० दिनांक .

| अनु. क्र. | विभाग | आवश्यक कंत्राटी कामगार (सहा महिने) | एकूण कंत्राट रक्कम | अर्जाची रक्कम + (९%SGST+९CGST)=एकूण रक्कम (रु.) | पतपत्र रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह, चेंबुरनाका एम/ पश्चिम, विभाग | १२ | २०,४८,९४५/- | ३०००+१८% GST = ३६००/- | |

वैदयकीय अधीकारी

मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतिगृह